महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
शिक्षण शुल्क समिती, मुंबई
(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१
Web:www.sssmumbai.org Tel-022 22694478 E-mail : sssbedmed@gmail.com/jd.hesss-mh@gov.in

**विषय:- दि.२६.०४.२०१७ रोजी सकाळी ११:०० वाजता मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती तथा अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग तथा यांच्या अध्यक्षतेखाली सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई, शासकीय अध्यापक महाविद्यालय, एल्फिस्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई - येथे शासकीय अध्यापक महाविद्यालयातील प्राचार्यांच्या दालनामध्ये पार पडलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीचे इतिवृत्त ..**

सदर बैठकीस खालील अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते

| अ.क्र. | उपस्थित अधिकारी/ पदाधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. पी. बी. कडवे, उपसचिव (मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| २ | डॉ. अण्णासाहेब स. खेमनार, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | सदस्य |
| ३ | श्री. आनंद परतानी, सनदी लेखापाल, औरंगाबाद | सदस्य |
| ४ | सौ. संगिता रमाकांत गायकवाड, खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | डॉ. रविंद्र कडू, खाजगी शिक्षक प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी (शारिरीक शिक्षणशास्त्र) | सदस्य |
| ६ | डॉ. सुशीलकुमार चोधरी, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई | सदस्य |
| ७ | मा. डॉ. धनराज माने- संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |
| ८ | मा. रोहिणी भालेकर, उप सचिव, उच्च शिक्षण, मंत्रालय, मुंबई | निमंत्रित |
| ९ | मा. उर्मिला जोशी, कक्ष अधिकारी, मशि-२, उच्च शिक्षण, मंत्रालय, मुंबई | निमंत्रित |
| १० | डॉ. तुकाराम गाढवे, तज्ज्ञ (निमंत्रित) | सदस्य |
| ११ | प्राचार्य, डॉ. रूबीना लाल, सुविद्या सेंटर ऑफ स्पेशल एज्युकेशन, मुंबई | निमंत्रित |
| १२ | श्री. मनिष शुक्ला, खर्च लेखापाल | निमंत्रित |
| १३ | श्री. धनाजी वासके, खर्च लेखापाल | निमंत्रित |

**या बैठकीत घेण्यात आलेले महत्त्वाचे मुद्देनिहाय निर्णय खालीलप्रमाणे......**

१. **मुद्दा क्र. १ राज्यातील शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या शुल्कास मान्यता मिळणेबाबत.**

शिक्षण शुल्क समितीने नियुक्त केलेले तज्ज्ञ तसेच उपसमिती यांनी छाननीअंती निश्चित केलेले बी. एड., एम. एड., बी. पी. एड. व एम. पी. एड. या अभ्यासक्रमाचे (महाविद्यालयांचे) एकूण ३०९ प्रस्ताव समितीसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. सदर प्रस्ताव स्प्रेड शिट स्वरूपात समिती सदस्यांसमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. समितीने सदर प्रस्तावापैकी १० टक्के मर्यादेत शिक्षण शुल्कात वाढ देण्याची शिफारस केलेले प्रस्ताव, १० टक्के पेक्षा जास्त नमुद केलेले प्रस्ताव व ऋण वाढ नमुद केलेले प्रस्ताव अशी वर्गवारी करून सदर प्रस्तावांची नमुनात्मक तपासणी करण्यात आली. त्यानुसार समितीने समितीने एकमताने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

१. **परिशिष्ट अ** मध्ये नमुद १८२ बी. एड. अभ्यासक्रमांच्या/महाविद्यालयांच्या उपसमितीने निश्चित/ अंतीम केलेल्या शुल्काला शिक्षण शुल्क समितीची मंजूरी देण्यात आलेली आहे.

२. **परिशिष्ट ब** उर्वरित ५ प्रस्तावापैकी ४प्रस्तावात त्रुटी असल्यामुळे संबंधीत महाविद्यालयांकडून त्रुटींची पूर्ण पूर्तता करून ती पुढील बैठकीत ठेवण्यात यावीत, असे ठरले तसेच एन. टी. व्ही. एस. महाविद्यालय नंदूरबार या महाविद्यालयाने मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केलेली असल्याने व सदर याचिका अद्यापही न्यायप्रविष्ठ असल्याने त्यांच्या प्रस्तावावर न्यायालयाचा निर्णय झाल्यावर बैठकीत निर्णय घेण्यात येईल असे ठरले.

३. **परिशिष्ट क** बी. एड अभ्यासक्रम (अल्पसंख्यांक) महाविद्यालयाच्या ११ प्रस्तावापैकी ०७ महाविद्यालयांच्या शुल्कास अंतिम मान्यता देण्यात आली.

४. **परिशिष्ट ड** उर्वरित ०४ प्रस्तावात त्रुटी असल्यामुळे संबंधीत महाविद्यालयांकडून त्रुटींची पूर्तता करून ती पुढील बैठकीत ठेवण्यात यावीत, असे ठरले.

५. **परिशिष्ट इ** शिक्षणशास्त्र तज्ज्ञांनी बी. एड अभ्यासक्रम महाविद्यालयाचे ६३ (पैकी ३ अल्पसंख्यांक महाविद्यालयांचे) प्रस्ताव मंजूर केलेले नाहीत. त्या महाविद्यालयांकडून त्रुटींची पूर्तता केल्यावर त्यांचे प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्याबाबत निर्णय झाला.

६. **परिशिष्ट फ** एम. एड महाविद्यालयांच्या १२ प्रस्तावांपैकी ०९ महाविद्यालयांच्या शुल्कास अंतिम मान्यता देण्यात आली आहे. यापैकी सेवासदन महाविद्यालय, उल्हासनगर येथे एम. एड. विनाअनुदानित हा अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्यात आलेला आहे यासंदर्भात मान्य झालेल्या ०९ महाविद्यालयांच्या शुल्काच्या सरासरी एवढे म्हणजेच किमान अंतरीम शुल्क रू. २५०००/- प्रतिविद्यार्थी ठरविण्यात आले. सदर महाविद्यालयाने कागदपत्रांची पूर्तता करून प्रस्ताव सादर केल्यानंतर त्यांचे अंतिम शुल्क मान्यतेचा प्रस्ताव समितीसमोर ठेवण्यात येईल.

७. **परिशिष्ट ग** उर्वरित ०३ प्रस्तावांत त्रुटी असल्यामुळे संबंधीत महाविद्यालयांकडून त्रुटींची पूर्तता केल्यावर त्यांचे प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावीत, असे ठरले.

८. **परिशिष्ट ह** शिक्षणशास्त्र तज्ज्ञांनी एम. एड अभ्यासक्रम महाविद्यालयाचे ०६ प्रस्ताव मंजूर केलेले नाहीत. त्या महाविद्यालयांकडून त्रुटींची पूर्तता केल्यावर त्यांचे प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्याबाबत निर्णय झाला.

९. **परिशिष्ट ई** बी. पी. एड अभ्यासक्रम महाविद्यालयाच्या एकूण २२ महाविद्यालयांच्या शुल्कास अंतिम मान्यता देण्यात आली.

१०. **परिशिष्ट ज** एम. पी. एड अभ्यासक्रम महाविद्यालयाच्या एकूण ०८ महाविद्यालयांच्या शुल्कास अंतिम मान्यता देण्यात आली.

शुल्क निश्चिती झालेल्या उपरोक्त महाविद्यालयांची यादी परिशिष्ट निहाय सोबत जोडलेली आहे.

२. **मुद्दा क्र. २ ज्या महाविद्यालयांनी पूर्वीच्या शिक्षण शुल्क समितीकडून शुल्क निश्चित करून घेतलेले नाही, अशा महाविद्यालयांसाठी शिक्षण शुल्क समिती, बांद्रा यांनी २०१०-११ ला बी. एड अभ्यासक्रमासाठी रू.३०,०००/- शुल्क व एम. एड अभ्यासक्रमासाठी रू. ४०,०००/- या मान्य करून दिलेल्या अंतरिम शुल्कास २०१६-१७ करिताचे प्रतिविद्यार्थी शुल्क म्हणून मान्यता मिळणेबाबत.**

:- शासकीय अध्यापक महाविद्यालयातील विनाअनुदानित एम. एड. अभ्यासक्रमाच्या शुल्काबाबत संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी निर्णय घ्यावा, असा निर्णय झाला.

३. **मुद्दा क्र. ३ एम. पी. एड अभ्यासक्रमाचे वर्ष २०१६-१७ साठी किमान शुल्क निश्चित करून मिळणेबाबत.**

:-याबाबत निर्णय झाला नाही.

४. **मुद्दा क्र. ४ सन २०१०-११ किंवा शिक्षण शुल्क समिती, बांद्रा कडून महाविद्यालयासाठी असलेले अंतिम मंजूर शुल्क वर्ष २०१५-१६ करिता विभागून देण्यास परवानगी मिळणेबाबत.**

:- सन २०१०-११ चे किंवा शिक्षण शुल्क समिती, बांद्रा यांनी निश्चित करून दिलेल्या शुल्कावर ५ टक्के वाढ करून ते दोन वर्षामध्ये विभागून देण्यास मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना अधिकार देण्यात आले होते. परंतु ज्या महाविद्यालयांनी सन २०१५-१६ चे शुल्क मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचेकडून प्रमाणित करून घेतले नाही. अशा महाविद्यालयांना सन २०१०-११ किंवा तत्पूर्वीचे शिक्षण शुल्क समिती, बांद्रा कडून महाविद्यालयासाठी असलेले अंतिम मंजूर शुल्क वर्ष २०१५-१६ करिता विभागून देण्याकरिता सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई यांना समितीने प्राधिकृत केलेले आहे.

५. **मुद्दा क्र. ५ महाविद्यालयांना वारंवार सूचना देऊन त्रुटींची पूर्तता न करणाऱ्या महाविद्यालयांबाबतचा निर्णय घेणेबाबत.**

:- जी महाविद्यालये दि.३१.०५.२०१७ पर्यंत प्रस्ताव सादर करणार नाहीत तसेच ज्या महाविद्यालयांना वारंवार सूचना देऊन त्रुटींची पूर्तता केली नाही अशा महाविद्यालयांची यादी प्रवेश नियामक प्राधिकरण, बांद्रा यांच्याकडे पाठवून त्या महाविद्यालयांचे सन २०१७-१८ पासून प्रवेश बंद करणेबाबत कळविणे.

६. **मुद्दा क्र. ६ शुल्क निश्चितीचे वर्ष २०१६-१७ चे प्रस्ताव स्विकृतीची अंतिम दिनांक ठरविणेबाबत.**

:-शुल्क निश्चितीचे वर्ष २०१६-१७ चे प्रस्ताव दंडात्मक रकमेसह व विलंब शुल्कासह स्विकृतीची अंतिम दिनांक ३१.०५.२०१७ ठेवण्यात आलेली आहे. यानंतर प्रस्ताव स्विकारले जाऊ नयेत.

७. **मुद्दा क्र. ७ उर्वरित प्रस्ताव तज्ज्ञांकडून तपासणीनंतर बैठकीस वेळ मिळणेबाबत.**

:- उर्वरित प्रस्तावांची तज्ज्ञांकडून तपासणी पूर्ण झाल्यानंतर पुढील बैठकीस मा. अध्यक्षांची वेळ मिळण्यासाठी पत्रव्यवहार करण्यात येईल.

८. **मुद्दा क्र. ८ ज्या महाविद्यालयांनी प्रस्ताव सादर केलेले नाहीत त्यांच्याकरिता विद्यापीठाशी संलग्नता रद्द करणेसाठी शासनाकडून पत्र देण्यास आदेश होणेबाबत.**

:-राज्यातील ज्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी दि.३१.०५.२०१७ पर्यंत शुल्क निश्चितीसाठी प्रस्ताव सादर केले नाहीत, अशा महाविद्यालयांचे सन २०१७-१८ चे प्रवेश रद्द करण्यासाठी यादी प्रवेश नियामक प्राधिकरण, बांद्रा यांना पाठविण्यात यावी.

९. **मुद्दा क्र. ९ राज्यातील विशेष बी. एड. अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाविद्यालयांना यापूर्वीच्या शिक्षण शुल्क समितीकडून शुल्क मान्यता मिळालेली नसल्यामुळे भारतीय पूनर्वास परिषदेच्या नियमांनुसार ठराविक शुल्क मान्य करून देणेबाबत.**

:-समितीने दोन वर्ष बी. एड. अभ्यासक्रमासाठी रू.१,२४,७६८/- प्रति विद्यार्थी एवढे शुल्क २५ विद्यार्थ्यांच्या वर्गाकरिता व रू. १,०३,९७३/- प्रति विद्यार्थी एवढे शुल्क ३० विद्यार्थ्यांच्या वर्गाकरिता तसेच बी. एड. विशेष अभ्यासक्रमासोबत महाविद्यालयात चालविण्यात येणाऱ्या दोन वर्ष एम. एड. अभ्यासक्रमासाठी रू.८८,४९५/- प्रति विद्यार्थी एवढे शुल्कास २०१६-१७ चे प्रवेशीत विद्यार्थ्यांकरिता अभ्यासक्रमाचे शुल्क म्हणून मान्यता देण्यात आली. हे शुल्क महाविद्यालयांनी समप्रमाणात विभागून दोन वर्षात आकारावे.

१०. **मुद्दा क्र. १० विशेष अभ्यासक्रमाकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावली व नमुना अर्जास मान्यता मिळणेबाबत व वर्ष २०१७-१८ चे शुल्क ठरविण्याकरिता प्रस्ताव मागविण्यास मान्यता मिळणेबाबत.**

:- शिक्षण शुल्क समितीमार्फत गठीत करण्यात आलेल्या समितीमार्फत बी. एड. विशेष अभ्यासक्रमाकरिता शुल्क निश्चितीकरिता तयार करण्यात आलेल्या नियमावली व नमुना अर्जास कुठल्याही महाविद्यालयाने सूचना केल्या नाहीत व हरकत घेतली नसल्यामुळे मान्यता देण्यात आली.

११. **मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी उपस्थित होणारे विषय.**

:- अ. उपसमितीचे सदस्य डॉ. गो. वि. पारगांवकर, सेवानिवृत्त झालेले असल्यामुळे त्यांचे जागी अन्य सदस्याच्या निवडीबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश अध्यक्ष महोदयांनी दिले.

ब. समितीचे सदस्य श्री. परतानी, सी. ए. यांनी खालील बाबी समितीसमोर मांडल्या

१. प्राप्त प्रस्तावांमध्ये काही महाविद्यालयांनी इनकम टॅक्स व प्रोफेशनल टॅक्स वेळेच्या वेळी भरलेला दिसून येत नाही.

२. कर्मचाऱ्यांचे वेतन कॅश पध्दतीने दिलेले दिसते. त्यामुळे प्रत्यक्षात त्यांना वेतन मिळाले किंवा कसे याबाबत शंकासमाधान होत नाही त्यामुळे सर्व महाविद्यालयांना यापुढे बँकेव्दारे डिजीटल वेतन देण्याबाबत निर्देश देण्यात यावेत.

३. प्रस्तावांची पूनर्तपासणी करण्यासाठी उपसमिती गठीत करण्यापेक्षा प्रत्येक विभागासाठी पॅनल तयार करावे, त्यात समितीतील एक सदस्य व एक सनदी लेखापाल किंवा खर्च लेखापाल यांचा समावेश असावा. जेणेकरून महाविद्यालयांच्या प्रस्तावांची तपासणी त्यांच्या विभागात होण्यास मदत होईल व त्यांचा मुंबईला येण्याचा वेळ व खर्चही वाचेल.

**यावर समितीने चर्चा करून खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे..**

अ. ज्या महाविद्यालयांनी लेखापरिक्षण अहवालामध्ये आयकर, प्रोफेशनल टॅक्स व इ. पी. एफ. देय दाखविला असेल परंतु पुढील प्रस्ताव सादर करताना भरलेला नाही अशा महाविद्यालयांची नावे प्रवेश नियामक प्राधिकरणास कळवून त्यांचे प्रवेश थांबविण्यात यावेत.

ब. या आर्थिक वर्षापासून सर्व महाविद्यालयांनी डिजीटल पेमेंट करणेबाबत महाविद्यालयांना ईमेलमार्फत कळविण्यात यावे, जी महाविद्यालये डिजीटल पध्दतीने वेतन व इतर देयके देणार नाहीत त्यांचे पुढील प्रस्ताव स्विकारू नये, असे ठरले.

क. मुद्दा क्र. ११ मधील ३ मध्ये सूचविल्याप्रमाणे उपसमिती ऐवजी पॅनल तयार करून त्यांच्यामार्फत विभागीय स्तरावर प्रस्तावांची छाननी करण्याबाबत समितीने शासनाकडे प्रस्ताव द्यावा.

मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या परवानगीने बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,
शिक्षण शुल्क समिती तथा
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे

अध्यक्ष,
शिक्षण शुल्क समिती तथा
अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय